RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016 -18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष २, अंक ७८] शुक्रवार, ऑगस्ट १९, २०१६/श्रावण २८, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १२१**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महिला व बालविकास विभाग**

३ रा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ ऑगस्ट २०१६

**अधिसूचना**

**बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६.**

क्रमांक बालवि. २०१४/प्र.क्र. ६७/का-९.— बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ (२००७ चा ६) याच्या कलम १६ ची पोट-कलमे (१) व (३) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या भाग-एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांचा, उक्त अनुसूचीच्या भाग-दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती व मर्यादांच्या अधिनतेने वापर करण्यासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना आपापल्या संबंधित प्रकल्प क्षेत्रावर अधिकारिता असणारे बाल विवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून याद्वारे नियुक्त करीत आहे, आणि उक्त अधिनियमाच्या कलम १६ च्या पोट-कलम (२) च्या प्रयोजनांसाठी बाल विवाह प्रतिबंध अधिकाऱ्याला सहाय्य करण्याकरिता संबंधित बालविकास प्रकल्प (नागरी) या अंतर्गत नेमलेल्या अंगणवाडी पर्यवेक्षिकांचीदेखील नियुक्ती करीत आहे.

**अनुसूची**

भाग एक

बाल विवाह प्रतिबंध अधिकारी पुढील अधिकारांचा वापर करील :—

(एक) बाल विवाह प्रतिबंध अधिकारी हा, केवळ बाल विवाह प्रकरणांमध्ये त्याच्याकडील पोलीस अधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करील. तथापि, अशा ठिकाणी भेट देतांना आवश्यक वाटल्यास ते पोलीस अधिकाऱ्यांची मदत घेऊ शकतात.

(दोन) बाल विवाह विधीपूर्वक लावण्यास प्रतिबंध करण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशी कारवाई करणे.

(तीन) अभिकथित आरोपी व्यक्तींवर प्रभावीपणे खटला चालविण्यासाठी साक्षी पुरावे गोळा करणे.

(चार) या अधिनियमान्वये व्यथित व्यक्ती व तिचे नातेवाईक किंवा तिच्यासोबत असणारी व्यक्ती किंवा अन्य व्यक्ती यांच्या हक्कांविषयी माहिती पुरविणे.

(पाच) राज्य विधी सहाय्य सेवा प्राधिकरणामार्फत व्यथित व्यक्तींना कायदेशीर सहाय्य पुरविणे.

(सहा) निवारा गृहांविषयी व्यथित व्यक्तीला माहिती देणे आणि आवश्यक असल्यास, न्यायालयाची कार्यवाही प्रलंबित असतांना अथवा व्यथित व्यक्तीच्या सुरक्षेच्या प्रयोजनासाठी निवारागृहामध्ये त्यांच्या निवाऱ्याची व्यवस्था करणे. तसेच,

(सात) त्याच्या अधिकारितेच्या क्षेत्रामध्ये बाल विवाह विधीपूर्वक लावण्याची शक्यता टाळण्यासाठी जागरुकता निर्माण करणे.

## भाग दोन

बाल विवाह प्रतिबंध अधिकारी हा, पुढील शर्ती व मर्यादांच्या अधिनतेने, उपरोक्त भाग-एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांचा वापर करील :—

(एक) बाल विवाह प्रतिबंध अधिकाऱ्यास केवळ त्याच्या अधिकारितेच्या क्षेत्रामध्ये उपरोक्त अधिकारांचा वापर करता येईल.

(दोन) बाल विवाह प्रतिबंध अधिकारी सद्‌भावनापूर्वक अधिकाराचा वापर करील.

(तीन) बाल विवाह प्रतिबंध अधिकारी, बळी पडलेल्या व्यक्तीला (बालकाला) सहाय्य करण्यासाठी अधिकारांचा वापर करील.

(चार) बाल विवाह प्रतिबंध अधिकारी केवळ बाल विवाहाच्या प्रकरणांमध्ये पोलीस अधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**स्मिता निवतकर,**
शासनाच्या उप सचिव.

## WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT

3rd Floor, New Administrative Building, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032, dated the 18th August 2016

*NOTIFICATION*

PROHIBITION OF CHILD MARRIAGE ACT, 2006.

No. Balvi-2014/CR-67/Desk-9.— In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*3*) of section 16 of the Prohibition of Child Marriage Act, 2006 (6 of 2007), the Government of Maharashtra hereby appoints the Child Development Project Officers (Urban) to be the child Marriage Prohibition Officer having jurisdiction over the area of their respective project to exercise the powers as specified in Part I of the Schedule appended hereto, subject to the conditions and limitations as specified in Part II of the said Schedule, for the purposes of the said Act ; and hereby also appoints the Anganwadi Supervisors, appointed under the respective Child Development Project (Urban) to assist the Child Marriage Prohibition Officer for the purposes of sub-section (*2*) of section 16 of the said Act.

*Schedule*

PART-I

The Child Marriage Prohibition Officer shall exercise the following powers, namely :—

(*i*) The Child Marriage Prohibition Officer shall exercise his powers of police officer only in Child Marriage cases. However, if required they can take help of Police Officers while visiting such places.

(*ii*) To prevent solemnization of Child Marriage by taking such action as he may deem fit.

(*iii*) To collect evidence for the effective prosecution of the alleged accused persons.

(*iv*) To provide the information about the rights of aggrieved person and his relatives or the person accompanying him or other person under the Act.

(*v*) To provide legal aid to the aggrieved person through the State legal Aid Services Authority ;

(*vi*) To inform the aggrieved person about the shelter homes and if required, arrange for their shelter in shelter home for the purpose of safety of the aggrieved person during the pendency of the proceedings of the court or otherwise ;

(*vii*) To keep vigilance in the area under his jurisdiction eliminating the possibility of solemnization of child marriage.

PART-II

The Child Marriage Prohibition Officer shall exercise the powers as specified in Part I above, subject to the following conditions and limitations, namely :—

(*i*) The Child Marriage Prohibition Officer may exercise above powers only in the area of his jurisdiction.

(*ii*) The Child Marriage Prohibition Officer shall exercise the power in good faith.

(*iii*) The Child Marriage Prohibition Officer shall exercise the powers to support the victim (Child).

(*iv*) The Child Marriage Prohibition Officer shall exercise the powers of Police Officer only in Child Marriage Cases.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SMITA NIVATKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.